| MHPU140038012019 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल तारीख | : | १३.१२.२०१९ |
| | नोंदणी तारीख | : | २४.१२.२०१९ |
| | निकाल दिनांक | : | ०६.०८.२०२६ |
| | कालावधी | : | वर्ष महिने दिवस<br>०६ ०७ २४ |

**विशेष न्यायालय, (न्यायालय क्र.३), बारामती, जि.पुणे यांचे न्यायालयात**

**(प्रभारी न्यायाधीश–हितेंद्र उर्मिला अनिलकुमार वाणी)**

**विशेष खटला क्र. १५२/२०१९** **निशाणी क्र.**

**भाग 'अ'**

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (I))**

| गु.र.क्र. ४३/२०२० भारतीय दंड संहितेचे कलम ३६३, ३६६, ३७६(१), ३७६(२)(i)(j)(n), ३७६(३) तसेच बालकांचे लैंगीक गुन्हयापासुन संरक्षण कायदा, २०१२ चे कलम ४, ६, ८ अन्वये<br>**पोलीस ठाणे – बारामती तालुका** | |
|---|---|
| **फिर्यादी** | महाराष्ट्र सरकारतर्फे बारामती तालुका पोलीस ठाणे, जि.पुणे. |
| **प्रतिनिधीत्व** | श्री. एस.बी.ओहोळ, अति.सरकारी अभियोक्ता, बारामती. |
| **आरोपी** | **सचिन दिपक गायकवाड**<br>वय : २३ वर्षे, व्यवसाय : मजुरी,<br>रा. तांबेनगर, भिगवण रोड, एमआयडीसी,<br>बारामती, जि. पुणे. |
| **प्रतिनिधीत्व** | श्री.आर. डी. क्षीरसागर वकील, आरोपीकरीता. |

**भाग 'ब'**

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii))**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | १०.११.२०१८ |

| | |
|---|---|
| फिर्याद पोलीस ठाण्यात नोंद झाल्याची तारीख | १२.११.२०१८ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख | १३.१२.२०१९ |
| आरोपीविरुध्द दोषारोप ठेवल्याची तारीख | २१.११.२०२२ |
| पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख | ०५.०८.२०२६ |
| निकालाची आरक्षीत तारीख | -- |
| निकालाची तारीख | ०६.०८.२०२६ |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख | -- |

## आरोपीचा तपशील

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली | दिलेली शिक्षा | फौप्रसं कलम ४२८ करिता संपरीक्षे दरम्यान निरुध्द केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सचिन दिपक गायकवाड | ०५.०१.२०१९<br>०३.०७.२०२६ | २४.०१.२०१९<br>जेलमध्ये | भारतीय दंड विधानाचे कलम ३६६, ३७६(२)(i)(j)(n), ३७६(३) तसेच बालकांचे लैंगीक गुन्हयापासुन संरक्षण कायदा कलम ४, ६, ८, | दोषमुक्त केले. | -- | १९ दिवस<br>१ महिना ३ दिवस |

### भाग 'क'
### ( फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (iii) )
### सरकारी/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

## अ. सरकारी साक्षीदार,

| क्रमांक | नांव | निशाणी क्र. | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| १ | पिडीता | २९ | तक्रारदार/फिर्यादी |
| २ | पिडीतेची आई | ३१ | साक्षीदार |

## ब. बचावाचे साक्षीदार,

| क्रमांक | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## क. न्यायालयीन साक्षीदार

| क्रमांक | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| -- | -- | -- |

### सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणंची यादी

## अ. सरकारी

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | ३० | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६४ अन्वये नोंदविलेला पिडीतेचा जबाब |
| २ | ३२ | फिर्याद |
| ३ | ३३ | छापील फिर्याद |

## ब. बचाव

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| -- | -- | -- |

क. न्यायालयीन निशाण्या

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| --- | --- | --- |

ड. भौतिक वस्तु

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| --- | --- | --- |

## न्यायनिर्णय

## (पारित दिनांक ६ ऑगस्ट, २०२६)

१. आरोपी हा भारतीय दंड संहितचे कलम ३६३, ३६६, ३७६(१), ३७६(२)(i)(j)(n), ३७६(३) तसेच बालकांचे लैंगीक गुन्हयापासुन संरक्षण कायदा, २०१२ चे कलम ४, ६, ८ अन्वयेच्या आरोपावरील संपरिक्षेस सामोरे जात आहे.

**अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन येणेप्रमाणे,**

२. दि.१०.११.२०१८ रोजी पिडीता ही घरी मिळुन न आल्याने तिची आई म्हणजे फिर्यादी यांनी तिला अज्ञात इसमाने फुस लावून पळवुन नेल्याबाबत बारामती तालुका पोलीस ठाणे येथे फिर्याद दाखल केली.

३. उपरोक्त नमूद फिर्यादीवरुन बारामती तालुका पोलीस ठाणे यांनी अपराध क्र.६९९/२०१८ अन्वये अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल केला.त्यानंतर दि.२३.१२.२०१८ रोजी पिडीता ही बारामती येथील दुर्गा टॉकीजसमोर फिर्यादीला मिळून आली असता तिला बारामती तालुका पोलीस

ठाणे येथे नेण्यात आले. त्यानंतर तिचेकडे चौकशी केल्यानंतर आरोपीने तिला लग्नाचे अमीष दाखवून नेल्याचे व तिचेशी वारंवार शारिरीक संबंध केल्याचे समजून आले. सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान तपासी अधिकारी यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदवले, घटनास्थळ पंचनामा केला, पिडीतेची वैद्यकीय तपासणी करुन घेउन त्याबाबतचा अहवाल प्राप्त केला व पिडीतेचे वयाबाबतचे शाळेतील कागदपत्र प्राप्त केले. तसेच आरोपीस अटक करुन त्याबाबतचा अटक पंचनामा तयार केला. तपासाअंती आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने बारामती तालुका पोलिस ठाण्याचे ठाणे अंमलदार यांनी आरोपीविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयामध्ये सादर केले.

४. माझे पूर्व पिठासिन अधिकारी यांनी आरोपीविरुध्द नि.क्र.८ अन्वये आरोप निश्चित केले व ते आरोपीस त्याच्या भाषेत समजावून सांगितले. आरोपीने गुन्हा नाकबुल केला व संपरीक्षेची तयारी दर्शविली. आरोपीचा बचाव नकारार्थी स्वरुपाचा असल्याचे त्याच्या फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अन्वयेच्या जबाबावरुन दिसुन येते.

५. खालील मुद्दे या खटल्याच्या न्यायनिर्णयार्थ माझ्या समक्ष उपस्थित होतात. त्यांना मी खालीलप्रमाणे माझे निष्कर्ष नोंदवून त्याची कारणमिमांसा सादर करतो.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपीने पिडीतेचे अपहरण केले? | नाही |
| २. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, पिडीतेला तिच्या इच्छेविरुध्द कोणत्याही व्यक्तीशी विवाह | नाही |

| | | |
|---|---|---|
| | करण्याची सक्ती करता यावी या उद्देशाने किंवा तिच्यावर तशी सक्ती होईल असा संभव असल्याची स्वतःला जाणीव असताना, अथवा विधिनिषिध्द संभोगाकरिता तिच्यावर बळजबरी करता यावी किंवा तिला तशी फूस लावता यावी या उद्देशाने अगर विधिनिषिध्द संभोगाकरता तिच्यावर बळजबरी होईल किंवा तिला तशी फूस लावण्यत येईल असा संभव असल्याची स्वतःला जाणीव असताना आरोपीने तिचे अपनयन किंवा अपहरण केले अथवा तिला एखाद्या ठिकाणावरुन दुर जाण्याकरीता प्रवृत्त केले? | |
| ३. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपीने १६ वर्षापेक्षा कमी वय असलेल्या पिडीतेवर वारंवार बलात्कार केला? | नाही. |
| ४. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपीने पिडीतेवर भेदक लैंगिक अत्याचार केला? | नाही. |
| ५. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपीने पिडीतेवर वारंवार लैंगीक आघात केला ? | नाही. |
| ६. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपीने पिडीतेचा लैंगीक छळ केला ? | नाही. |
| ७. | काय आदेश ? | आरोपी निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दे क्र.१ ते ६ करिता</u> –**

६. उभय पक्षांच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

७. आरोपीवरील आरोप सिध्द करणेकामी अभियोग पक्षाने केवळ अ.सा.क्र.१ पिडीता (नि.क्र.२९) व अ. सा. क्र. २– पिडीतेची आई (नि. क्र. ३१) यांना तपासले. सदर दोन्ही साक्षीदारांनी आपल्या पुराव्यात अभियोगपक्षास सहकार्य न करता अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे कुठलीही घटना घडली नसल्याचे नमुद केले. सबब विद्वान सरकारी अभियोक्ता यांनी सदर दोन्ही साक्षीदारांना उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारले मात्र त्यातही आरोपीस त्यांचे विरोधातील आरोपात गुंतवणारा व अभियोगपक्षाच्या कथनास पुरक असा कुठलाही पुरावा आलेला नाही.

८. अ.सा.क्र.१ पिडीता (नि.क्र.२९) हिने आपल्या पुराव्यात तिचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६४ अन्वये जबाब (नि.क्र. ३०) नोंदविण्यात आल्याचे जरी कबुल केले असले तरी, सदर जबाब हा सारभूत पुरावा (substantive evidence) नसल्याने केवळ सदर जबाबतील कथनांच्या आधारे आरोपीवरील आरोप सिध्द झाल्याचे म्हणता येणार नाही. प्रस्तुत प्रकरणातील इतर साक्षीदार हे ऐकीव स्वरुपाचे साक्षीदार असल्याने व पिडीतेने व तिचे आईने अभियोग पक्षास पुराव्या दरम्यान सहकार्य केलेले नसल्याने अभियोगपक्षाने इतर साक्षीदार तपासले नसल्याचे दिसून येते.

९. उपरोक्त विवेचनावरुन प्रस्तुत प्रकरणात आरोपीस त्यांचे विरोधातील आरोपात गुंतवणारा व अभियोगपक्षाच्या कथनास पुरक असा कुठलाही पुरावा आलेला नसल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत अभियोगपक्ष

आरोपीवरील आरोप सिध्द करण्यात सपशेल अपयशी ठरल्याचे माझे ठाम मत होते. सबब मुद्दा क्र.१ ते ६ यावर मी नकारार्थी निष्कर्ष नोदवित आहे.

**मुद्दा क्रमांक ७ करिता –**

१०. मुद्दा क्रमांक १ ते ६ यावर मी नकारार्थी निष्कर्ष नोंदविल्याने आरोपीस त्याच्या विरोधातील आरोपातून दोषमुक्त करणे क्रमप्राप्त होते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी **सचिन दिपक गायकवाड** यास फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २३५(१) अन्वये भारतीय दंड संहितेचे कलम ३६३, ३६६अ, ३७६(१), ३७६(२)(i)(j)(n), ३७६(३) तसेच बालकांचे लैंगीक गुन्ह्यापासुन संरक्षण कायदा कलम ४, ६, ८ अन्वयेच्या शिक्षापात्र अपराधातून दोषमुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीची इतर गुन्ह्यात आवश्यकता नसल्यास त्याची तुरुंगातून तात्काळ मुक्तता करण्यात यावी.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४३७ (अ) च्या पुर्ततेसाठी रक्कम रु.२५,०००/– चे बंधपत्र व तेवढयाच रकमेचा जातमुचलका सादर करावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by HETENDRA ANILKUMAR WANI
Date: 2026.08.07 17:31:41 +0530

(हितेंद्र उर्मिला अनिलकुमार वाणी)

दिनांक – ०६.०८.२०२६ प्रभारी विशेष न्यायाधीश (न्यायालय क्र.३),

बारामती